INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# जागतिकीकरणाचा महिलांवर होणारा परिणाम

**दत्तात्रय रामराव वाघमारे**
संशोधक विद्यार्थी
प्र.मुख्याध्यापक
जि.प. प्राथमिक शाळा, होलेवस्ती, ता.वैजापूर, जि.औरंगाबाद
Email: drwaghmare786@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/09.2021-27889132/IRJHIS2109022**

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्थेत औद्योगिक क्रांतीनंतर अनेक परिवर्तन झाले व औद्योगिक क्रांतीचा परिणाम म्हणून मुक्त व्यापार ही संकल्पना भारतात आली.त्यामुळे मुक्त बाजारपेठेला चालना मिळून भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण झाले.या जागतिकीकरणामुळे समाजात सर्वच बदल घडुन आले.त्यात लिंगभावाधारित स्त्रियांचाही समावेश आहे. त्याच अनुषंगाने जागतिकीकरणाचा परिणाम त्यांच्या कामावरही झालेला दिसतो, त्यामध्ये त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातही बदल झाले आणि त्यातून त्यांचे काही प्रमाणात सक्षमीकरण घडुन येण्यास चालना मिळाली. यामध्ये आर्थिक क्षेत्रातील त्यांच्या कामावर होणारा परिणाम आणि त्यातून होणारे सक्षमीकरण याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

महिला सक्षमीकरण ही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणारी प्रक्रिया आहे.लिंगभेदावर आधारित विषमतापूर्ण व्यवस्था नष्ट करुन स्त्री-पुरुष समानता निर्माण करणे व स्त्रियांना जीवनाच्या सर्वच क्षेत्रात प्रतिनिधित्व व प्रतिष्ठा मिळवून देणे हे या प्रक्रियेचे स्वरुप आहे.महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया स्त्रियांना आत्मनिर्भर व स्वावलंबी बनविण्यासाठी पोषक अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने निर्माण होणारी आहे.

महिला सक्षमीकरण हे स्त्रियांना स्वातंत्र्य, राजकीय आणि आर्थिक धोरण निश्चितीमध्ये भागीदारी तसेच समान कामासाठी समान वेतन आणि कायद्याचे संरक्षण व अधिकारांची प्राप्ती यांच्याशी संबंधित आहे.अर्थातच महिला सक्षमीकरणाच्या राष्ट्रीय धोरणाचा उद्देश स्त्री-पुरुष विषमता नष्ट करणे,स्त्रियांना विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणे,त्यांना स्वावलंबी बनवणे आणि देशाच्या विकासाच्या प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे हा आहे.जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने महिलांवर चांगले वाईट काय परिणाम झाले याचा ही अभ्यास या अनुषंगाने केला आहे.

**उद्दिष्टये :**

१.औद्योगिक क्षेत्रातही महिलांना दुय्यम वागणूक मिळते याचा अभ्यास करणे.

२ जागतिकीकरणातही महिलांना लिंगभावात्मक दृष्टीने काम दिले जाते.

**गृहितके :**

१ जागतिकीकरणाने महिलांच्या रोजगाराच्या संधी कमी झालेल्या दिसतात.

२ तांत्रिक विकास व औद्योगिकरण प्रगतीमध्येही महिलांना लिंगभावात्मक वागणुक असलेली दिसते.

**संशोधन पध्दती :**

या लेखामध्ये दुय्यम स्त्रोतांचा वापर केला गेला आहे.

ब्रिटीशांच्या काळात औद्योगिकरणाची सुरुवात झाली व स्त्रियांच्या शिक्षणाचीही ब्रिटिशांच्या औद्योगिक धोरणामुळे भारतीय समाजव्यवस्थेतील पारंपारिक गृहउद्योग, हस्तउद्योग नष्ट झाले. शहरांची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली व औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीमुळे समाजातील प्रत्येक व्यक्तींचे जीवनमान बदलले. पुढे जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण या संकल्पनांनी तर समाजातील लोकांचे प्रत्येक क्षेत्रातील स्थान बदलले.

नवीन आर्थिक धोरण राबविताना विकासावर भर देण्यात आला. त्यातून नव-नवीन तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, मुक्तबाजारपेठ यांचा विस्तार, आयात-निर्यातीला चालना, औद्योगिकरणाचा मोठ्या प्रमाणात विकास या सर्व बाबींवर भर देण्यात आला.त्यातूर काही चांगले परिणाम समोर आले .तर काही विपरित परिणामही समोर आले.म्हणजेच जागतिकीकरणाने नवीन तंत्रज्ञानावर भर देण्यात आला. त्यातून नवीन तंत्र,यंत्रे यांचा शोधही लागला पण ही यंत्रसामुग्री निर्माण करतानाही ती पुरुषांना लक्षत घेऊनच बनवली गेली. स्त्रियांचा विचार यात केला गेला नाही असे दिसते आणि दुसरीकडे पारंपारिक हस्तउद्दोग संपुष्टात आल्याने स्त्रियांचे ते कामही बंद झाले.त्यामुळे स्त्रियांची अवस्था दयणीय झाल्याचे दिसते, असे मालविका कारलंकर यांनी Feminization of Scavenging या लेखात सफाई कामगारामध्ये कशाप्रकारे कामाचे स्त्रीकरण झाले याविषयी त्यांनी मत मांडले आहे.त्याचबरोबर त्या म्हणतात की, नवीन तंत्रे,मशीन्स चालविण्याची कामे पुरुषांना व कौशल्य विरहित साफसफाईची हलकी कामे स्त्रियांना देण्यात आली.यामधून आपल्याला असे दिसते की, नवीन आर्थिक धोरण राबवूनही उत्पादक रोजगाराची उपलब्धता झाली नाही.त्यातून मोठ्या प्रमाणात कामगाराचे विशेषता स्त्री कामगाराचे शोषण झाले.यातूनच आपल्याला भारतातील जागतिकीकरणाचा परिणाम स्त्रियांच्या कामाच्या स्वरुपात कसा झाला हे दिसते व यामध्ये अनेक दुस-या गोष्टीतही बदल घडून आले त्यात पुढील काही महत्वाचे मुद्दे येतात. त्यात प्रामुख्याने असंघटित व संघटीत क्षेत्रातील स्त्री कामगार यांच्याविषयी विचार केला आहे.

जागतिकीकरणाच्या अभ्यासकांच्या मते,मुक्तबाजारपेठेत काही धंद्यात स्थानिक व परकीय गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर होऊन त्यातून नव्या नोक-या निर्माण होतील, मात्र वास्तवात तसे झाले नाही. १९९८-९९ साली जागतिक बेरोजगारीबद्दल आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने एक अहवाल प्रसिध्द केला तो Wold Employment Report-

1998 असा आहे. यानुसार जगातील ३०० कोटी कामगारांपैकी १४ कोटी कामगार बेकार होते आणि ७५ ते ९० कोटी कामगार अर्धवेळ काम करणारे होते. सद्याची भारताची आकडेवारी पाहता असे दिसते की, नॅशलन सॅम्पल सर्वे ऑफिस (NSSO) कडून भारतामध्ये २०११-२०१२ या कालावधीत बेरोजगाराचे प्रमाण काय आहे याचा सर्वे केला गेला.

त्यात असे दिसून आले की, ग्रामीण भागात पुरष ३: तर स्त्रियांमध्ये ४: आणि शहरी भागात पुरुष ४: तर स्त्रिया ७: इतके बेरोजगारीचे प्रमाण होते.(प्रती १००० मागे ) यावरुन असे दिसते की, जागतिकीकरणातून अविकसित राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेत जो बदल होतो त्यामूधन बेकारी,विषमता आणि दारिद्र्य वाढलेले दिसते.या बाबतीत जयंती घोष यांनी म्हटले आहे की, आशिया खंड हा एक जागतिक आणि आर्थिक गतीमान प्रदेश झाला आहे. त्यामुळे तेथील कामांचे स्वरुप याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. स्त्रियांच्या कामाच्या संबंधित वरवर पाहता चार परस्परविरोधी बदल सद्यस्थितीत दिसतात त्यामध्ये १)वेतन कामगार २) कमी वेतन कामगार ३)विनावेतन कामगार ४)स्त्रियांची खुली बेरोजगारी

या व्यतीरिक्त औपचारिक-अनौपचारिक मानधनाधारित काम इत्यादी मधून स्त्रियांना भेदभावाधारित कमी वेतन काम दिले आते.

**जागतिकीकरण आणि अनौपचारिक क्षेत्र :**

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या दिशेने सर्व क्षेत्रात आर्थिक सुधारणा घडवून आणण्यासाठी नवीन आर्थिक धोरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेत समावेश करण्यात आला.यामुळे स्त्रियांना जबरदस्तीने असंघटित क्षेत्रात जावे लागले आणि त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले गेले. जागतिकीकरणाने आंतरराष्ट्रीय पातळीवर श्रमाधारित संरचना उदयास आली ह्या प्रक्रियेत कामगारांची सामाजिक सुरक्षितता आणि वैधानिक संरक्षण तोडून टाकण्यात आले.मल्टिनेशनल कंपन्यांनी स्वस्त श्रमात जास्त नफा हा पैसा कमवण्याचा सोपा मार्ग निवडला.आशियाई स्त्रिया ह्या नफा कमावण्याचा किफायतशीर मार्ग ठरल्या आहेत.कारण त्यांचे श्रम नॅशनल कंपन्यांना स्वस्तात उपलब्ध झाले आहे.यामुळे असंघटित अनौपचारिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. औपचारिक आणि अनौपचारिक ह्या परस्परविरोधी संकल्पना आहेत. औपचारिक क्षेत्रात वेतन, कामाचे तास, संरक्षण, विमा ह्या सर्व बाबींची हमी असते तर अनौपचारिक क्षेत्रात याच्या उलटे म्हणजे काहीच नसते. त्यामुळे कामगारांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होते.

अनौपचारिक क्षेत्रात काम करताना ब-याचदा स्त्रियांना नगांवर पैसे दिले जातात.आइडवा (AIDWA) नवी दिल्ली या संस्थेने २००१ मध्ये (Report on the Household Workers in Delhi ) या अहवाला कामाचा प्रकार आणि नगाचा दर यासंबंधी माहिती दिली आहे व नगाधारित वेतनच स्त्रियांना दिले जाते.जसे की,उदाहरनार्थ ८०० बाटल्याचे दोनशे रुपये,१४४ नगांना ८० पैसे,१४४ पाकिटांना ३ ते ४ रुपये शिवाय त्यांना यामुळे तुटपूंज्य वेतनावर काम करावे लागते. त्यात त्यांनी कुठल्याही प्रकाराची हमी, सुरक्षितता नाही म्हणून यातून स्त्री श्रमीकांचे शोषण मोठ्या प्रमाणात होते.

**जागतिकीकरण आणि कामाचे बदलते लिंगभाव संबंध :**

कामाच्या बाबतीत जो काही अभ्यास झाला त्यात अभ्यासकांना असे दिसले की,पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या कामाच्या स्वरुपात बदल झाले आहेत त्यामध्ये पुरुषांच्या व स्त्रियांच्या कामाच्या स्वरुपात गुणात्मक फरक आहे.स्त्रियांचे सहसा त्यांच्या स्वतःच्या कामावर, श्रमावर नियंत्रण नसते. विशेषतः जर ग्रामीण भागात बघितले तर स्त्रियांच्या दैनंदिन श्रमाच्या वितरणाचा निर्णय हा बहुतेकदा परंपरा किंवा कुटूंबाच्या गरजेनुसर होत असतो.यामुळे स्त्रिया जेंव्हा उत्पादक श्रम करतात तेव्हा त्या घरगुती श्रमाचाच एक भाग म्हणून त्याकडे बघतात. हे आपणास मारिया मिझ यांच्या Housewifization संकल्पनेवरुन कळते.ही श्रमविभागणी अशी प्रक्रिया आहे जी स्त्रियांना गृहिनीपणामध्ये कनिष्ठ दर्जावर ढकलते. यामुळे रोजगार सर्वेक्षण करताना स्त्रियांचे आर्थिक कार्य आणि घरगुती कार्य यामधील वेळेच्या वितरणाचे मूल्यांकन करताना समस्या येतात. त्यामुळे स्त्रिया जरी स्वतःचा संपूर्ण वेळ हा उत्पादक कार्यावर खर्च करीत असतील तरी तो उत्पादक श्रमाचा भाग म्हणून गणला जात नाही.भारतीय संदर्भात स्त्रियांच्या कामाचे संकल्पनिकरण करत असताना, पितृसत्ता, समाज, कौटुंबिक नातेसंबंध याकडे दुर्लक्ष करणे हे अशक्य आहे. कारण ह्या बाबी स्त्रियांच्या श्रमाचे वितरण कशाप्रकारे आणि कोणत्या गोष्टीमध्ये करायचे यावर नियंत्रण ठेवतात.जी काही शासकीय धोरण विकसनशील देशांनी राबविली ती लिंगभाव असंवेदनशील असलेली दिसून येतात.ही धोरणे स्त्रियांना व्यवस्थापन आणि उच्च स्थानापर्यंत जाण्यासाठी जी संरचना आहे ती पुरुषकेंद्री असलेली दिसते.

काचेच्या भिंती आणि काचेचे छत या संकल्पनेप्रमाणे स्त्रियांच्या प्रगतीमध्ये जे संरचनात्मक अडथळे आहेत ते अदृश्य असल्याचे दिसते. त्यामुळे स्त्रिया ह्या काचेच्या भिंती फोडण्यास यशस्वी होतात. त्यांच्याकडे आधीच सामाजिक,सांस्कृतिक,आर्थिक भांडवल उपलब्ध असते हे लक्षात घेणे गरजेचे आहे.तर दुस-या बाजूस ज्या स्त्रियांकडे आर्थिक भांडवल उपलब्ध नसते त्या स्त्रियांकडे अनौपचारिक क्षेत्रात काम करण्याव्यतिरिक्त दुसरा पर्यायच शिल्लक राहत नाही, तर औपचारिक क्षेत्रात झालेली महिलांची मर्यादित प्रगती ही प्रचंड प्रमाणात विकसनशील देशात त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जबाबदा-यांचे दुर्लक्ष करते. स्त्रियांचे श्रम हे कधीही पुरस्कृत केले जात नाही.त्यामुळे स्त्रियांच्या कामाला नेहमी पुरुषांच्या कामाच्या तुलनेत कनिष्ठ दर्जाचे ठरवून दुय्यम समजले जाते.

भारताच्या संदर्भात जागतिकीकरणाने मुख्यत्वे करुन स्त्रियांचे विस्थापन,वस्तुकरण आणि आधुनिक गुलामगिरी या बाबींशी संबंध जोडला गेला आहे.संगणकीय,रोबोटिक्स सारख्या तांत्रिक प्रगतीमुळे स्त्रिया या उत्पादन प्रक्रियेच्या बाहेर ढकलल्या गेल्या त्यामुळे स्त्रियांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढलेले दिसते.जागतिकीकरणाने दलित आदिवासी महिलांवरही परिणाम झाल्याचे दिसते. रोजगाराच्या संधी कमी झाल्या आणि वाढत्या महागाईने त्या मुलभूत वस्तु घेण्यासाठी असमर्थ ठरल्या.त्यामुळे पौष्टिक पातळी आणि तीव्र उपासमार यांना चालना मिळाली.

**सारांश :**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आणि भारतीय आर्थिक धोरणानुसार आज २१ व्या शतकातही आपल्याला स्त्रियांच्या कामाची अवहेलना झालेली दिसते.अनौपचारिक क्षेत्रात त्यांना मिळणारी वागणुक आणि त्यांच्या कामाचे

होणारे मूल्यमापन यात मोठ्या प्रमाणात पुरुषकेंद्री अर्थव्यवस्था आणि स्त्रियांकडे लिंगभावात्मक दृष्टीने दुय्यम स्वरुपात बघण्याचा दृष्टीकोन समोर असतो.त्यामुळे आजही स्त्रियांना अनेक संधी प्रत्येक क्षेत्रात उपलब्ध असताना लिंगभावात्मक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक या सर्व क्षेत्रात संकुचित दृष्टीने त्यांना कनिष्ठ स्वरुपाची कामे दिली जातात. म्हणून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत महिलांचे जे सक्षमीकरण व्हायला पाहिजे ते काहीच प्रमाणात झालेले दिसून येते. आणि त्यांच्या श्रमाचेही योग्य मूल्य त्यांना मिळत नसल्याचे दिसते.यासाठी आता समान वेतन ही संकल्पना रुढ झाली आहे.

**संदर्भ सुची :-**

१) डॉ.स्वाती कर्वे, स्त्री विकासाच्या पाऊल खुणा, प्रतिभा प्रकाशन, पुणे.

२) डॉ.डोळे ना.य., उदारीकरण -नवे आर्थिक धोरण १९९७ - विद्या प्रकाशन, नागपूर

३) डॉ.शुभांगी गव्हाणे, महिला सबलीकरण-स्वरुप व समस्या, वरद पब्लीकेशन, औरंगाबाद

४) डॉ.शैलेंद्र देवळणकर, समकालिन जागतिक राजकारण २००५, विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.

५) Beneria Laurdes (2003), Gender-Development and Globalization Economics.